# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/06/2021 (शुक्रवार)


## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 04 कि. मी. अंतरावरील मौजा भारसिंगी शाळेजवळ रोडकटींग नागपूर रोड येथे दिनांक 16/06/2021 चे 13:00 वा. दरम्यान शेख रहेमान शेख रमजान( मृतक ) वय 48 वर्ष रा. वरूड हे आपले पत्नी व मुलासह एम.एच– 27/सी.एस– 3184 क्रमांकाच्या होंडा शाईन मोटरसायकलने वरुड वरुन नागपुर ला पत्नीचे डोळयाच्या इलाजा करीता जात होते. त्यादरम्यान भारसिंगी बस स्टॉप जवळ यातील एमएच–31/सीपी– 8615 क्रमांकाचा वॅगनार कारचा चालक आरोपी नामे– जयकुमार बेलखेडे याने त्याचे ताब्यातील कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन वरील मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक– शेख रहेमान शेख रमजान( मृतक ) यांचे मरणास व शबनम प्रवीण शेख रहेमान वय 35 वर्ष, शेख सोहेब शेख वय 10 वर्ष यांचे जखमी होण्यास आरोपी कारणीभुत ठरला. मृतकचा उपचार लता मंगेश्वर हॉस्पीटल हिंगना येथे सुरू असतांना दि. 22/06/2021 रोजी सायंकाळी 07.00 वा. मरण पावला. हॉस्पीटल येथुन पो. स्टे. ला प्राप्त कागदपत्रा वरुन सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शेख मोहमद शेख रेहमान वय 31 वर्ष रा. वरुड संत्रा मार्केट यांचे रिपोर्ट वरुन पो. स्टे. जलालखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ जोशी 7499760728 हे करीत आहे.

2) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 06 कि. मी. अंतरावरील नक्षी मरू नदी पुला जवळ येथे दिनांक 23/06/2021 चे 13:30 वा. दरम्यान आरोपी क्र 1) दिलीप गोपाळराव देशमुख (मृतक) वय 55 रा तातोली ता भिवापुर हा आपली एमएच– 40/ एम– 6387 क्रमांकाच्या मोटरसायकलने भिवापुर कडुन नक्षी कडे जात असता एमएच– 31/डीजे– 080 क्रमांकाचा मोटरसायकलचा चालक आरोपी क्र 2) सुरेश हैबतराव चौधरी वय 55 रा झिलबोडी ता भिवापुर हा त्याचे मोटरसायकलने नक्षी कडुन भिवपुर कडे येत असता दोन्ही आरोपीतांनी आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन जवळील रोडवरील मरूनदी पुल नक्षी शिवार येथे दोन्ही आरोपीतांनी रोडच्या मधोमध एकमेकांना विरूद्ध दिशेने धडक दिली. या अपघातात आरोपी क्र 1) दिलीप देशमुख याचा मृत्यु झाला तर आरोपी क्र 2) सुरेश चौधरी हा जबर जखमी झाला. तसेच आरोपी क्र 2. च्या मोटरसायकलवर बसलेले दोन इसम क्र 1) हेमराज विघ्नश्वर गांवडे, वय 65 वर्ष व 2) जिय बापुराव चांभारे वय 65 वर्ष, दोन्ही रा. झिलबोडी हे जखमी झाले. दोन्ही आरोपी विरूद्ध चौकशी अहवानावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा राजेन्द्र सेलोकर पोस्टे भिवापुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री शरद भस्मे मो. नं. 9764946808 हे करीत आहे.

## शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो. स्टे. रामटेक :– फिर्यादी नामे– सौ. ममता ईश्वर भुते, वय 29 वर्ष, रा. साटक व आरोपी पति क्र. 1. नामे– ईश्वर मधुकर भुते, रा. साटक हे दोघेही पतीपत्नी आहेत. अंतर्गत 12 कि.मी. अंतरावर साटक येथे दिनांक 02/11/2017 चे 11.00 वा. ते दिनांक 23/02/2021 चे 09.00 वा. सुमारास आरोपी क्र. 1. व 2. अंबीका प्रदीप हटवार यांनी संगनमत करून फिर्यादीला लहान सहान कारणावरून झगडाभांडन करून तिला मारहाण केली. तसेच घर घेण्याकरीता वारंवार माहेरून पैश्याची मागणी केली. आरोपीतांनी मागणी पूर्ण न झाल्यानंतर फिर्यादीला शारीरिक व मानसिक त्रास देवुन तिचा छळ केला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम 498 (अ), 323, 504 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपाउपनि मिना बारंगे या करीत आहे.

## शासकीय कामकाजात अळथळा निर्माण करणाऱ्या आरोपीविरूध गुन्हा नोंद

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 05 कि.मी अंतरावरील टेकाडी आंबेडकर चौक येथे दिनांक 24/06/2021 चे 14.30 वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– अनीता भिमराव कोतरे, वय 42 वर्ष, रा. खापरखेडा या एम.ए.सी.बी इलेक्ट्रीक बील वसुली करीता गेली असता आरोपी 1) अशोक पिलाजी पाटील, 2) प्रविन अशोक पाटील दोन्ही रा. टेकाडी यांनी अश्लील शिवीगाळ करून धक्का–बुक्की करून अंगावर लाकडी काठी घेवुन धावुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 353, 34 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार रामटेके हे करीत आहे.

## गांजा बाळगणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 12 कि.मी. अंतरावर तारसा ते मौदा येथे दिनांक 24/06/2021 चे 19.25 वा. ते 21.10 वा. दरम्यान पो. स्टे. मौदा येथील पोलिस स्टाफ पो. स्टे. हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे आरोपी नामे– मदन दौलत हटवार, वय 48 वर्ष, रा. तारसा त. मौदा याच्या घराजवळ जावून त्याची अंगझडती व घरझडती घेतली असता सदर आरोपीचे घराच्या बाजुला गोठयामधुन एक पांढऱ्या रंगाचे प्लास्टीक पन्नी उघडुन पाहीले असता त्यात गुंगीकारक वनस्पती ओलसर गांजा ज्याचे वजन 114.820 ग्रॅम असा एकुण कि. 2,000/–रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस निरीक्षक श्री. विजय जाधव पो स्टे मौदा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 20, 22 एनडीपीएस ॲक्ट कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री सोनेकर मो.क्र 9130001715 हे करीत आहे.

<u>जबरी संभोग</u>

<u>पो.स्टे. खापरखेडा</u> :– दि. 24.01.21 ते 31.01.21 सुमारास आरोपी क्र 1. अनिलकुमार श्रीवास्तव वय 30 वर्ष, रा. दिल्ली हा आरोपी क्र 2. रिनु जब्बर यादव वय 37 वर्ष, रा. वलनी हिचा मित्र/प्रियकर आहे. आरोपी क्र 1 याने 17 वर्षीय पिडीत/फिर्यादी हीचे घरी जानेवारी सन 2021 च्या शेवटच्या आठवडयात येवुन फिर्यादीवर वांरवार जबरदस्तीने शारीरिक संबंध केले. फिर्यादीने कोठे वाच्चता करू नये, याकरीता आरोपीने तिला मारपीट करून धमकी दिली. आरोपी क्र 1 याने फिर्यादी सोबत केलेल्या गैरकृत्याबाबत तीने आरोपी क्र 02 व 03. शंभुनाथ पाल वय 60 वर्ष, रा मिलन चौक खापरखेडा यांना सांगितले असता त्यांनी सुध्दा तिला वाच्चता करन्यास मनाई केली व अशा प्रकारे गुन्हयास प्रोत्साहन दिले. फिर्यादीने पोस्टे मानकापुर येथे दिलेल्या अशा स्वरूपाच्या रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 376(2)(एन),323,506 भा.द.वि., सहकलम 5(एल) चे उल्लंघन 06,17 लैंगिक अपराधापासून बालकाचे सरंक्षन अधि–2012 कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि नंदा पाटील पोस्टे कन्हान मो.नं 8419953444 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर